खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

SPB
SHRI PISARNATH
BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

वर्ष : ०५ | अंक : ३३८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१९ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी बातमी

# ठाकरेंच्या ६ बंडखोर खासदारांच्या गटाला विलीनीकरणाला मंजुरी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्वाची बातमी समोर येत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सोडचिठ्ठी देवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या सर्व सहा खासदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. या सर्व सहा खासदारांच्या गटाला शिंदेंच्या शिवसेनेत विलीनीकरणाला लोकसभा सचिवालयाकडून मान्यता मिळाली आहे. त्यामुळे शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी ठाकरे गटाच्या सर्व सहा खासदारांच्या गटाला शिंदेंच्या शिवसेनेत विलीनीकरण होण्यास मंजुरी दिली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत: याबाबत माहिती दिली आहे.



लोकसभा सचिवालयाकडून आज एक सर्क्युलर झालं आहे. यामध्ये पार्टी पोजिशन इन लोकसभा असं म्हटलं आहे. त्यामध्ये शिवसेना पक्षाचे गटनेते श्रीकांत शिंदे म्हटलं आहे आणि त्यांच्यासोबत १३ खासदार आहेत, असं म्हटलं आहे. त्यामुळे सहा फुटीर खासदारांच्या शिंदे गटातील विलीनीकरणाला मान्यता मिळाल्याचं स्पष्ट झालं आहे. विशेष म्हणजे तृणमूल काँग्रेसचा निर्णय अद्याप झालेला नाही. पण ठाकरे गटाच्या फुटीर खासदारांचा निर्णय झालाय. तृणमूल काँग्रेसच्या फुटीर खासदारांना स्वतंत्र बसण्याची परवानगी मिळाली आहे.

**लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयानंतर एकनाथ शिंदेंची प्रतिक्रिया**

आम्ही कुणाला तोडणारे नाहीत तर जोडणारे आहोत. त्यामुळे जे ६ खासदार शिवसेनेत आले आहेत त्यांच्या मतदारसंघातील जनतेला न्याय देण्यासाठी आणि जनतेप्रती असणारी त्यांची जबाबदारी पार पाडण्यासाठी आले आहेत. त्यामुळे त्यांना आम्ही नक्कीच सहकार्य करु. त्यांच्या मतदारसंघात चांगलं काम होईल, त्यांना विकासनिधी मिळेल, आणि आम्ही काम करुन दाखवलं असं ते लोकांसमोर जाऊन सांगू शकणार आहेत, अशी पहिली प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली. जे २० ते ३० लाख जनतेतून निवडून येतात त्यांना मतदारसंघात काम करण्याची जबाबदारी असते. जे खासदार आले आहेत त्यांनी वैयक्तिक कारणास्तव शिवसेनेत प्रवेश केलेला नाही. त्यांना आम्ही विकासनिधी देऊ. आम्ही गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत त्यांची गाठ करुन दिली. सर्व खासदारांची कामे आम्ही करु, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

**शिंदेंचा ठाकरेंना टोला !**

ठाकरेंच्या पक्षाकडून शिवसेनेत येणाऱ्यांना पैसे घेतल्याचा आरोप केला जातो. जेव्हा आमदार-खासदार त्यांच्यासोबत असतात तेव्हा ते चांगले आहेत. त्यांच्यासोबत नाही राहिले तर ते बेकार आहेत. ठाकरेंना हजारो लाखो लोकं का सोडून जात आहेत? याबाबत त्यांनी आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे.

आमदार, खासदार, नगरसेवकाच्या पाठिमागे ठामपणे उभे राहण्याचं काम पक्ष प्रमुखांचं असतं. त्यांना रामभरोसे सोडण्याचं काम पक्षप्रमुखांचं नसतं. तसं झालं तर लोक कसे राहतील. त्यामुळे ज्यांना सोडून लोकं येत आहेत त्यांनी का सोडत आहेत? याचा विचार केला पाहिजे, अशा शब्दांत त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली.

## जागेच्या वादातून मोठ्या भावाचा कुऱ्हाडीने हल्ला

### धाकट्या भावाचा मृत्यू, पत्नी गंभीर जखमी




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, सावली (चंद्रपूर) :** सावली तालुक्यातील पाथरी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या डोंगरगाव (मस्के) येथे एक अत्यंत धक्कादायक आणि थरारक घटना उघडकीस आली आहे. केवळ घराच्या जागेच्या वादातून सख्ख्या मोठ्या भावाने आपल्या धाकट्या भावावर आणि त्याच्या पत्नीवर कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला केला. या भीषण हल्ल्यात धाकट्या भावाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, त्याची पत्नी नागपूर येथे मृत्यूशी झुंज देत आहे.

**भरदिवसा घडले थरारनाट्य !**

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवार, १७ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास कुकसू बावणे आणि त्यांची पत्नी योगिता बावणे हे आपल्या घरात काम करत होते. याच वेळी घराच्या जागेच्या जुन्या वादावरून मोठा भाऊ आरोपी शामराव बावणे याच्यासोबत त्यांचा वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की शामरावने घरातून कुऱ्हाड आणून दोघांवरही सपासप वार केले.

उपचारादरम्यान धाकट्याचा मृत्यू, पत्नीची प्रकृती चिंताजनक :

हल्ल्यानंतर कुकसू आणि योगिता दोघेही रक्ताच्या थारोळ्यात पडले. त्यांना तातडीने गडचिरोली येथील सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, दोघांचीही प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नागपूरला रेफर करण्यात आले. दुर्दैवाने, नागपूर येथे उपचार सुरू असतानाच कुकसू बावणे यांची प्राणज्योत मालवली. तर योगिता बावणे यांच्यावर अद्याप उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

या घटनेमुळे डोंगरगाव परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून सख्ख्या भावानेच रक्ताचे नाते कलंकित केल्यामुळे नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी आरोपी शामराव बावणे यांना अटक करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यजित आमले यांच्या मार्गदर्शनाखाली पाथरीचे ठाणेदार नितेश डोर्लीकर आणि पोलीस उपनिरीक्षक गोविंद चाटे पुढील तपास करत आहेत.

## आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकाराने 'देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह'

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आ. किशोर जोरगेवार यांच्या वतीने १५ ते २३ जुलै या कालावधीत 'देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहात विधानसभा क्षेत्रात सामाजिक, आरोग्य,धार्मिक व जनहिताचे विविध उपक्रम राबविण्यात येणार असून, याबाबतची माहिती आ. किशोर जोरगेवार यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे, भारतीय जनता पार्टीचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री रविंद्र गुरनुले, सविता दंढारे, तुषार सोम, बलराम डोडाणी, अजय जयस्वाल, प्रमोद शास्त्रकार, प्रविण गिलबिले आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छांचा वर्षाव न करता समाजोपयोगी कार्यातून जनतेची सेवा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण आठवडाभर विविध सेवा उपक्रम राबवून सर्वसामान्य नागरिकांना थेट लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



सेवा सप्ताहांतर्गत जिल्ह्यातील तब्बल ५६ ठिकाणी भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रक्तसंकलन करून गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. तसेच १९ जुलै रोजी भवानजीभाई शाळेत भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, या शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक वैद्यकीय सल्ला, औषधोपचार आणि विविध आजारांवरील विशेष उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांपर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

याशिवाय जिल्हाभर ५६ महाआरत्या, ५६ योग शिबिरे, ५६ वृक्षारोपण कार्यक्रम आणि ५६ बुद्ध वंदना आयोजित करण्यात येणार आहेत. २२ जुलै रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, बाबूपेठ येथील अभ्यासिकेचे लोकार्पण, दिव्यांग नागरिकांना साहित्य वाटप, विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण, उत्कृष्ट खेळाडूंचा सत्कार तसेच महाशिवलिंग येथे महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे. २३ जुलै रोजी सेवा सप्ताह यशस्वीपणे राबविणाऱ्या कार्यकर्त्यांचा सत्कार करून या उपक्रमाची सांगता करण्यात येणार आहे.

पत्रकार परिषदेत आ. किशोर जोरगेवार यांनी नागरिकांनी या सेवा सप्ताहातील सर्व कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सेवा, आरोग्य सुविधा, पर्यावरण संवर्धन आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहोचविण्याच्या उद्देशाने हा सेवा सप्ताह आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## आषाढी यात्रेसाठी मंदिर समितीची 'हायटेक' सुरक्षा

### मंदिर परिसरात १९० अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे

**अक्षराज : विकास सरवळे**




**दि.१८, पंढरपूर :** आषाढी एकादशी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात येणाऱ्या लाखो वारकरी व भाविकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मंदिर परिसरात व्यापक सीसीटीव्ही यंत्रणा उभारली आहे. मंदिर, मंदिर परिसर, श्री संत तुकाराम भवन, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, संपूर्ण दर्शन रांग, पत्राशेड तसेच इतर महत्त्वाच्या ठिकाणी कायमस्वरूपी व तात्पुरत्या स्वरूपात एकूण १९० अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर दररोज मंदिरात आणि दर्शन रांगेत भाविकांची मोठी गर्दी होत आहे. ही वाढती गर्दी सुरळीतपणे नियंत्रित करणे, दर्शन रांग शिस्तबद्ध ठेवणे आणि भाविकांना सुरक्षित वातावरणात दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देणे, हा या अत्याधुनिक देखरेख यंत्रणेचा प्रमुख उद्देश असल्याचे श्री. शेळके यांनी सांगितले.

मंदिर समितीने उभारलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेमुळे दर्शन रांगेतील घुसखोरी, अनुचित प्रकार, संशयास्पद हालचाली, गर्दीचे व्यवस्थापन, हरवलेल्या व्यक्तींचा शोध तसेच आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत पोहोचविणे अधिक सुलभ झाले आहे. नियंत्रण कक्षातून वॉकीटॉकीच्या माध्यमातून सुरक्षा कर्मचारी, स्वयंसेवक व संबंधित अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक त्या सूचना त्वरित दिल्या जात आहेत. त्यामुळे कोणतीही परिस्थिती उद्भवल्यास काही क्षणांत आवश्यक उपाययोजना करता येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या संपूर्ण यंत्रणेचे नियंत्रण करण्यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर तसेच श्री संत तुकाराम भवन येथे स्वतंत्र असे दोन अत्याधुनिक नियंत्रण कक्ष (कंट्रोल रूम) कार्यान्वित करण्यात आले आहेत. या नियंत्रण कक्षामधून मंदिर परिसरातील प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

सीसीटीव्ही नियंत्रण कक्षात राजेंद्र घागरे, अनंता रोपळकर, योगेश साळुंखे आणि रघुनाथ शिंदे या प्रशिक्षित ऑपरेटरची पूर्णवेळ नियुक्ती करण्यात आली असून, या संपूर्ण यंत्रणेची जबाबदारी विभागप्रमुख अमित नवाळे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तसेच कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापक यांच्या कार्यालयांनाही या सीसीटीव्ही प्रणालीचा थेट ॲक्सेस उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांना मुख्यालयातूनच संपूर्ण व्यवस्थेवर सतत लक्ष ठेवता येत आहे.

सीसीटीव्हीद्वारे चित्रित होणारा सर्व डेटा सुरक्षित पद्धतीने संग्रहित करण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. भविष्यात आवश्यकतेनुसार या फुटेजचा वापर तपासासाठी किंवा इतर प्रशासकीय कारणांसाठी करता येणार आहे.

यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी सांगितले की, वारकरी भाविकांना केंद्रस्थानी ठेवून ज्या-ज्या ठिकाणी सीसीटीव्हीची आवश्यकता होती, त्या सर्व ठिकाणी अत्याधुनिक कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या व्यवस्थेमुळे भाविकांच्या सुरक्षिततेत मोठी भर पडणार असून, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत पोहोचविणे आणि संपूर्ण परिसरावर प्रभावी नियंत्रण ठेवणे अधिक सुलभ होणार आहे.

## चंद्रनगर-शिगाव रस्त्याच्या दुरुस्तीसाठी संघर्ष तीव्र; १५ ऑगस्टला 'अन्नत्याग आंदोलन'चा इशारा

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१८, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील चंद्रनगर ते शिगाव या अत्यंत खराब झालेल्या रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून रस्ता दुरुस्त करावा, या मागणीसाठी ग्रामस्थांनी उभारलेले आंदोलन आता अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या आश्वासनानंतरही प्रत्यक्षात रस्ता दुरुस्तीचे काम सुरू न झाल्यास येत्या १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हा परिषद पालघरच्या प्रमुख प्रवेशद्वारासमोर एक दिवसाचे 'अन्नत्याग आंदोलन' करण्यात येईल, असा इशारा ॲड. विराज गडग यांनी दिला. यापूर्वी ग्रामस्थांनी संबंधित विभागांना निवेदन देऊन रस्ता दुरुस्तीसाठी एक आठवड्याची मुदत दिली होती. मात्र, मुदत संपूनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने ॲड. विराज गडग यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये 'भात रोपणी आंदोलन' करून प्रशासनाचा निषेध नोंदविला. यावेळी अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

आंदोलनादरम्यान ॲड. विराज गडग यांनी सांगितले की, चंद्रनगर-शिगाव मार्गावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि वाहनचालकांना रोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेक वेळा प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही दुर्लक्ष होत असल्याने आता लोकशाही मार्गाने आंदोलनाची तीव्रता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आंदोलनात शिगावच्या सरपंच दीप्ती सुमडा, हनुमाननगरचे सरपंच गुलाब खरपडे, उपसरपंच प्रदीप रिंजड, वनईच्या सरपंच कामिनी जनाठे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुनील पऱ्हाड आणि माजी विस्तार अधिकारी मधु चौधरी यांनी मार्गदर्शन केले. रस्ता



दुरुस्त न झाल्यास पुढील काळात आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी माजी सरपंच कृष्णा सातपुते, सदस्य बाबुराव खरपडे, सदस्य रंजना डोके, डॉ. स्वप्निल गडग, नीलम गोरखाना, बाबू घुटे, नारायण झिरवा, तुलसी गडग, विशाल मोर, संतोष पाटारा, रमेश गवळी, मंगेश सवरे, काशिराम झिरवा, रजनीताई गडग, पुष्पाताई वरठा, दत्ता दिवा, विनोद बसवत, काशिनाथ हाडल यांच्यासह पंचक्रोशीतील विविध गावांतील हजारो ग्रामस्थ, महिला आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

ग्रामस्थांनी प्रशासनाला तातडीने रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे आवाहन करत, अन्यथा स्वातंत्र्यदिनी होणाऱ्या अन्नत्याग आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशारा दिला आहे.




## शहरात गुर-ढोर वाऱ्यावर का?

आपण पहातो ही, राज्यातील अनेक शहरांमध्ये गुरेढोरे लावारीस मोकाट फिरतांना दिसतात किंवा रस्त्यावर मोकाट जनावरांचा ठिय्या दिसून येतो.यामुळे वाहनचालकांचा किंवा जनावरांचा अपघात होऊन जीव धोक्यात येऊ शकतो आणि अशा अनेक दुर्घटना झाल्या सुध्दा आहेत व ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. तरीही सरकार किंवा प्रशासन याकडे जातीने लक्ष देत नाही हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये गायीला अत्यंत मोलाचे आणि महत्त्वाचे स्थान आहे त्यामुळे तीला गोमाता म्हणून संबोधले जाते.परंतु आज मोठ्या प्रमाणात गायी (गुरेढोरे) रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर किंवा मुलांच्या खेळण्याच्या ग्राऊंडमध्ये बसलेले दिसतात आणि आपल्या आहारासाठी व विसाव्यासाठी भटकत असतात. त्याचप्रमाणे गायी जेव्हा रस्त्यावर किंवा वस्तीमध्ये फिरतात तेव्हा त्यांचा झुंड कचऱ्याच्या ढीगाऱ्याकडे जातांना जास्त दिसते कारण त्यांना आशा असते की, इथे मला काही तरी नक्कीच खायला मिळेल परंतु याठिकाणी त्यांच्या दृष्टीने संपूर्ण विषेली पदार्थ असतात.अशा परिस्थितीत गुरेढोरे जहरील्या वस्तू खातात;ज्या त्यांच्या शरीराला घातक असतात. उदाहरण द्यायचे झाले तर,प्लास्टिक,कपडा किंवा प्लॅस्टिकमध्ये इंजेक्शन किंवा ब्लेड किंवा विषेली पदार्थ सुद्धा असू शकतात;त्या जर त्यांच्या पोटात चुकीने गेल्या तर त्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत मनपा प्रशासन व नगरसेवकांचे दायित्व असते की,गोरक्षाच्या माध्यमातून प्रत्येक जनावरांचा जीव वाचविला पाहिजे.परंतु त्यांची रक्षा न करता त्यांना वाऱ्यावर सोडल्याचे चित्र नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये मोकाट फिरणाऱ्या गुराढोरांवरून लक्षात येते. उदाहरण द्यायचे झाले तर,नागपूर येथील प्रभाग क्रमांक ३१ मध्ये राजीव गांधी पार्क या ठिकाणी बास्केट बॉल ग्राउंड आहे. परंतु या ग्राउंडमध्ये मोठ्या प्रमाणात गुरेढोरे जमा होतात. अशा परिस्थितीत ते आपसात भिडतात व त्यांची टक्कर होते अशा परिस्थितीत बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंचा अपघात होऊ शकतो. या संपूर्ण बाबींचा विचार करून मनपा प्रशासनाने आणि नगरसेवकांनी यावर तोडगा काढुन गुराढोरांसाठी योग्य जागा उपलब्ध करावी किंवा मोकाट जनावरांना गोशाळेत स्थान द्यावे.कारण गुरेढोरे रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर बसले असतात तेव्हा त्यांचा किंवा मानवी अपघात सुध्दा होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही.याकरीता मोकाट फिरणाऱ्या जनावरांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने पुर्वनीयोजीत उपाययोजना करणे गरजेचे आहे. मोकाट जनावरांचा सर्वसामान्यांना त्रास नाहीच परंतु त्यांच्या खानपानात विषेली वस्तू जाने किंवा कळतनकळत रस्त्यावर बसलेल्या जनावरांचा किंवा मानवी अपघात होने ही दुःख बाब आहे.त्यामुळे नागपूर शहरात असो अथवा राज्यातील इतर शहरात असो मोकाट गुराढोरांची व्यवस्था गोशाळेत व्हायला पाहिजे हे प्रशासनाचे दायित्व आहे.मुसळधार पाऊस,निसरडे रस्ते, रस्त्यावरील खड्डे,कमी झालेली दृश्यमानता आणि त्यातच अचानक समोर येणारे मोकाट जनावरे नागपूरकर वाहनचालकांसाठी हा अनुभव रोजचाच झाला आहे आणि हिच स्थिती राज्यातील अनेक शहरांमध्ये असु शकते. अशाप्रकारे पावसाळ्यात रस्त्यावर वाढलेल्या मोकाट जनावरांच्या वावरामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये वर्षागणिक मोकाट जनावरांचा प्रश्न अधिक गंभीर होत असल्याचे दिसून येते. यामुळे पावसाळ्यात संभाव्य अपघात टाळण्यासाठी मनपा प्रशासनाने तातडीने विशेष मोहीम राबवून मोकाट जनावरांना योग्य स्थान देऊन त्यांना गोशाळेत पाठविण्यात आले पाहिजे, तसेच निष्काळजी पशुपालकांवर कारवाई करून शहरातील प्रमुख रस्ते,मुलांचे खेळण्याचे ग्राउंड सुरक्षित करावेत.मोकाट जनावरांचा किंवा मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या मानवी दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने मोकाट जनावरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची नितांत आवश्यकता आहे.यामुळे मोकाट जनावरांची रहाण्याची, खानपानची योग्य सुविधा होईल व अपघातावर आळा बसेल.

जय हिंद!

**- रमेश लांजेवार**

# बँकिंग व्यवस्थेत राष्ट्रीयीकृत बँकाचे 'योगदान'

देशात सध्या अमृतकाल सुरू आहे आणि देशाच्या स्वातंत्र्याचा शतकोत्सव २०४७ देश जगातील एक महाशक्ती, विश्वगुरू म्हणून आपली ओळख निर्माण करेल असा विश्वास आपले नेतृत्व देशाला देत आहे आणि देशाची वाटचाल त्या दिशेने सुरू आहे. कोणत्याही देशाच्या सर्वांगीण विकासात बँकिंग व्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावते, त्यामुळेच बँकिंग व्यवस्थेला देशाच्या आर्थिक विकासाची नस म्हणून ओळखले जाते, देशाच्या आजवरच्या वाटचालीत बँकिंग व्यवस्थेने मोलाची भूमिका बजावली आहे आणि यापुढेही बँकिंग व्यवस्था तितकीच महत्वाची भूमिका बजावत रहाणार. आज बँकाचे खाजगीकरण, बँकाचा तोटा, बँकांमधील घोटाळे, याची चर्चा होत असतांना बँकिंग क्षेत्रात अमुलाग्र बदल होत आहेत, बँकिंग श्रेत्रासाठी येणारा काळ मोठा आव्हानात्मक असणार आहे आणि त्याचा समाजातील सर्वच घटकांवर बरे-वाईट परिणाम - दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे. येणारा काळ आर्थिक मंदीचा असेल असे भाकित असे भाकित वर्तविले जात आहे, अश्यावेळी देशाची आर्थिक स्थिती बँका कशी हाताळणार हे येणार काळच ठरवेल.सगळी सोंगे वठविता येतात मात्र पैशाचे सोंग वठविता येत नाही याची प्रचिती आपण सगळेच घेत आहोत. दिवाळी साजरी होत आहे, सणावराचे दिवस सुरू आहेत, अश्यावेळी अर्थकारणाचे व्यवस्थापन आपल्या बँकिंग व्यवस्थेकडून कसे केले जाते, यावरच आपल्या सगळ्यांचा आर्थिक ताळमेळ कसा बसणार हे अवलंबून आहे.देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर पर्यंत न्यायचे उद्दिष्ट गाठायचे असेल तर बँकिंग क्षेत्राला महत्त्वाची भूमिका बजवावी लागेल.

परकिय इंग्रजांशी प्रदीर्घ काळ लढा दिल्यानंतर अखेर आपणा भारतीयांना १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री स्वातंत्र्य मिळाले, जनतेला, जनतेचे, जनतेसाठीचे, जनतेने निवडून दिलेले 'आपले' सरकार मिळाले, स्वातंत्र्यतर मिळाले, मात्र तत्कालीन देशाचे नेतृत्व करणाऱ्यांपुढे अनेक आव्हाने उभी होती, मर्यादित साधन संपत्ती, फाळणीची जखम, भांडवलदारांची नफेखोरी, सुई न देखील बनविणाऱ्या भारताला जगात ओळख निर्माण करायची होती, शक्तीशाली भारत बनायचे होते. या सगळ्यांसाठी आवश्यकता होती ती पैशाची. कुठल्याही देशात अर्थव्यवस्था महत्वाची असते आणि अर्थ व्यवस्थापना साठी बँकिंग व्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावते. स्वातंत्र्य पुर्व काळात ईम्पिरिअल बँक असलेल्या बँकेचे रुपांतर एका विशेष कायद्यान्वये रिझर्व्ह बँकेत १९३५ साली करण्यात आले आणि या बँकेकडे देशाचे आर्थिक व्यवस्थापन, बँकिंग




व्यवस्थेचे परिचालन, नियंत्रण, देशाच्या चलनाचे नियोजन, नियंत्रण, परदेशातील आर्थिक व्यवहार हे रिझर्व्ह बँक करते. त्याच बरोबर एका विशेष अधिनियम द्वारे १ मे १९५५ रोजी भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया ची स्थापना करण्यात आली.बँकांचे नियमन, परिचालन बँकिंग नियमन कायदा १९४९ नुसार होते या कायद्यात २०२१ साली सुधारणा करण्यात आली असून आता बँकांचे नियमन नॅशनल बँक फॉर फायनांसिंग इन्फ्रास्ट्रक्चर अँड डेव्हलपमेंट कायदा २०२१ या नावाने ओळखला जातो.

स्वातंत्र्यपूर्व आणि नंतरच्या काळात अनेक खाजगी भांडवलदारांच्या बँका देशात कार्यरत होत्या. मनमानी कारभार, व्याजदर आकारणी, कर्मचाऱ्यांची पिळवणूक, नफेखोर प्रवृत्ती अशी खाजगी बँकांची कार्यपद्धती होती. देशाच्या ऐकुणच वाटचालीत बँकिग क्षेत्राचे महत्त्व ओळखून तत्कालीन पंतप्रधान कै. इंदिरा गांधी यांनी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा ऐतिहासिक निर्णय घेतला आणि १९ जुलै १९६९ रोजी १४ खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले, कालांतराने १९८० साली आणखी ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. देशातील सर्वच घटकांना बँकिंग व्यवस्थेचा लाभ मिळावा, कर्ज पुरवठा व्हावा यासाठी विभागीय ग्रामीण बँका, जिल्हा सहकारी बँका, राज्य सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, खाजगी बँका, ग्रामीण भुविकास बँका,खाजगी बँका, परदेशी बँका स्थानिक पातळीवर पतपेढी संस्था असे बँकिंग क्षेत्राचे देशभर जाळे विणले गेले ज्यायोगे कधी काळी क्लास बँकिंग अशी बँकांची ओळख आता मास बँकिंग अशी होऊ लागली.बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आल्याने जवळपास ९० व्यवसाय राष्ट्रीयीकृत बँका कडे वळला. बँकिग क्षेत्रात स्पर्धा वाढुन बँकांचा व्यवसाय, बँकिंग सेवा यामध्ये अमुलाग्र बदल झाला. बँकांमध्ये जवळपास १५ लाखांपेक्षा अधिक रोजगार निर्मिती झाली, बँकांमधील नोकरीला सेवाहमी, निवृत्तीवेतन, असे अनेक लाभ मिळु लागले. त्याच बरोबर बँका या सरकारच्या मालकीच्या असल्याने दरवर्षी बँकांमधील नफ्यापैकी काही हिस्सा सरकारला डिव्हिडंड च्या स्वरुपात मिळु लागला. त्याच बरोबर सरकारच्या अनेक आर्थिक योजना राष्ट्रीयीकृत आणि इतर बँका मार्फत राबविले जाऊ लागले. कार्पोरेट कंपन्या, उद्योग, छोटे - मोठे व्यावसायिक, व्यापारी, बेरोजगार, शेती, सेवा, समाजातील आर्थिक दुर्बल घटक, विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज, नोकरदार वर्गाला, घर खरेदी, वाहन खरेदी, पेंशनधारकांसाठी कर्ज ईतर वैयक्तिक कारणांसाठी योग्य दरात कर्ज मिळणे सुलभ झाले. आणीबाणीच्या काळात २० कलमी कार्यक्रमाअंतर्गत सरकारच्या अनेक योजना बँकांमार्फत राबविल्या गेल्या. अगदी अलिकडच्या काळात २०१५ सरकारची अटल पेंशन योजना, प्रधानमंत्री फसल बीमा योजना, अल्प दरात वीमा योजना त्याच बरोबर २०१६ साली राबवली गेलेली नोटबंदीची अंमलबजावणी करण्यात बँकांनी विशेषतः सरकारी बँकांनी मोलाची भुमिका बजावली. बँकांमधील कर्मचारी/अधिकारी वर्ग कायमच आपले योगदान देत असतात. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे हे काही फायदे असले तरी बँकांच्या कारभारात सर्व पक्षीय राज्यकर्त्यांचा हस्तक्षेप, कर्जाची गुणवत्ता न तपासता कर्ज मेळावे घेऊन बँकांना कर्ज वाटप करणे भाग पाडले गेले. बँकांमधील झारीतील शुक्राचार्य, नोकरशहा, सहेतुक करोडो रुपयांचे कर्ज बुडवे, कर्ज वसुली बाबत बँकांची भुमिका, कायद्यातील पळवाटा यामुळे अनेक बँकांचे करोडो रुपये बुडवले जातात, म्हणजेच जनतेच्या पैशाचा अपव्यय होतो आणि अर्थातच त्याचा भार तुमच्या - आमच्या सारख्यांना सोसावा लागतो. १९९१ च्या जागतिक आर्थिक धोरणांमुळे बँकांची कार्यपद्धतीच बदलली गेली, सेवाभावा पेक्षा फायदा - तोट्याचा ताळेबंद मांडला जाऊ लागला. बँकांची अनुत्पादक मालमत्ता ही बँकिंग क्षेत्रासाठी चिंतेचा विषय बनु लागली, कायदेशीर वसुलीसाठी होणारा कालापव्यय, यामुळे वसुलीवर मोठा विपरीत परिणाम होऊ लागले आणि ताळेबंद स्वच्छतेच्या नावाखाली बँकांच्या करोडो रुपयांच्या हक्काच्या पैशांवर पाणी सोडले गेले. बँका या जणु काहींसाठी लुटीची कुरणेच बनली, त्याचीच प्रचिती २०१७ साली निरव मोदी-मेहुल चौक्सी यांनी भारतीय बँकांना करोडो रुपयांचा चुना लावत परदेशी पलायन केले, त्याच बरोबर विजय मल्ल्याने देखील सुमारे ९ हजार कोटी रुपयांचे कर्ज बुडवून परदेशी पलायन केले, याची यादी खुप मोठी आहे. त्या अगोदरच्या काळात देखील अनेक बँका मध्ये कोट्यावधी रूपयांचे घोटाळे झाले होते. गेल्या दहा वर्षांत अनेक बँकांनी कोट्यावधी रुपयाचे कर्ज निर्लेखित करून टाकले आहे. विशेष म्हणजे निर्लेखित केलेली कर्जे ही सर्व सामान्यांची नसुन शंभर कोटी रुपयांहुन अधिक कर्ज घेणाऱ्या थकित कर्जदारांची आहे.१९९१ च्या दशकात आर्थिक उदारीकरण, जागतिक मंदी, बँकांचे संगणकीकरण, यामुळे बँकांची आर्थिक गणितं बिघडु लागली त्यातच सरकारने बँकांमधील आपली गुंतवणूक कमी करण्यासाठी बँकांचे विलिनीकरण, निर्गुंतवणुकीचे तसेच काही प्रमाणात बँकांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतला. ऐकेकाळी सार्वजनिक श्रेत्रातील बँकांची संख्या २७ एवढी होती तर आता ती दहा ईतकी राहिली आहे, त्यातुनही केवळ चार मोठ्या बँका निर्माण करण्याचा सरकारचे धोरण आहे. काही बँक ऑफ बडोदा मध्ये तर पंजाब नॅशनल बँक या बँकांमध्ये इतर बँकांचे विलीनीकरण करण्यात आले तर गेल्या वर्षी बँक ऑफ महाराष्ट्र च्या खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. खाजगीकरणाद्वारे सरकार निधी उभारण्याचा प्रयत्न करीत आहे हे योग्य कि अयोग्य हे काळच ठरवेल मात्र जनतेच्या मालकीच्या, सरकारी बँका खाजगी भांडवलदारांच्या दावणीला बांधल्या गेल्या तर देशाच्या दृष्टीने ते कितपत योग्य ठरेल? खाजगी बँका त्वरीत, घरपोच सेवा जरूर देतात मात्र त्याची किंमत देखील वसुल करतात आजच्या घडीला सर्व सामान्य जनता आर्थिक कोंडीत सापडली असतांना किती जणांना खाजगी बँकांच्या सेवांचा लाभ घेता येईल? आता बँकांचा प्रवास पुन्हा एकदा खाजगीकरण ते खाजगीकरण व्हाया राष्ट्रीयीकरण असा सुरू झाला आहे, मास बँकिंग कडून क्लास बँकिंग कडे बँका वळु लागल्या आहेत.बँकाचे खाजगीकरण देशहिताचे आहे कि नाही याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे.

सद्यस्थितीत केंद्र सरकार, देशातील अनेक राज्य सरकारे, कार्पोरेट सेक्टर, लहान - मोठे उद्योजक, शेतकरी, गरीब मध्यमवर्गीय, सामान्य जनता सगळेच कर्जबाजारी झाले आहेत, आणि त्याचा थेट संबंध बँकिंग व्यवस्थेशी आहे. अगोदरच आर्थिक मंदीचे सावट असतांना आखाती युद्ध संकटाने, सगळ्यांचीच आर्थिक घडी विस्कळीत झाली आहे, अशावेळीच महागाईचा आगडोंब, बेरोजगारी, यामुळे सगळेच बेजार झाले आहे, महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक सातत्याने आपल्या रेपो दरात वाढ करीत आहे, परिणामी बँकांची कर्जे देखील महाग होऊन त्याचा विपरीत परिणाम जनतेवर होत आहे. सध्या देशात अमृतकाल सुरू आहे, देशाची वाटचाल पाच ट्रिलियन डॉलर च्या दिशेने सुरू आहे, देशाचा विकास दर, आयात-निर्यात, सर्वांगीण विकास यासगळ्या गोष्टींचा संबध बँकिंग व्यवस्थेशी आहे. अशा वेळी बँकिंग व्यवस्था सक्षम करण्यासाठी योग्य ते प्रयत्न व्हायला हवेत. बँकिंग क्षेत्राचे महत्त्व हे इतर क्षेत्रापेक्षा फारच वेगळे आहे, अशा वेळी बँकिंग क्षेत्राला हाताळतांना सर्व बाजूंनी विचार करूनच बँकिंग श्रेत्राची दिशा ठरवायला हवी.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## छलिया

तुझ्यामाझ्याअंतरात
कुठे नाही पंढरीनाथ
जिथे तिथे तोच दिसे
सर्व व्याप्त जगन्नाथ

जागोजागी दिसे हरि
जागाअसे काळजात
धाव घेतो तोच आधी
जेंव्हाभक्त काळजीत

कणोकणी तोचं वसे
सोबतीस्त अव्याहत
स्मतृगामी तोअंतरात
नाम स्मरण प्रत्याहत

संगेचालतो वारीमध्ये
अडखळता देतो हात
तोच पूर्ण करतो वारी
दे पुण्य भक्त पदरात

करी स्वागत पंढरीत
तळमळी तो इष्टागत
हरिस्वरुप होतो भक्त
आप्त सारे अभ्यागत

विठूराया फक्त माझा
कलागत मी विवादात
निर्भेळ निरामय सारे
मीठ मिसळे आनंदात

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक ... अचूक बातमी

# खापरखेडा परिसरात उघड्यावरील मटण-चिकन मार्केटमुळे नागरिक त्रस्त

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** सध्या संपूर्ण राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाकडून अवैध व नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्यांवर धडक कारवाईचा सपाटा सुरू आहे. या धडक कारवाईमुळे राज्यभरातील भेसळयुक्त आणि विनापरवाना खाद्य विक्रेत्यांचे धाबे दणाणले असताना खापरखेडा व अन्नामोड परिसर मात्र याला अपवाद ठरत असल्याचे चित्र आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर अतिक्रमण करून मटण व चिकन विक्रेत्यांनी बाजार मांडला आहे. मात्र, स्थानिक प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासन विभाग कुंभकर्णी झोपेत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

अन्नामोड आणि खापरखेडा परिसरात चिकन व मटण मार्केट राष्ट्रीय महामार्गालगत आहे. हा परिसर चिचोली व चनकापूर ग्रामपंचायत हद्दीत येतो. मागील अनेक वर्षांपासून या ठिकाणी उघड्यावरच मटण आणि चिकनची सर्रास विक्री केली जात आहे. स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाने यासंदर्भात संबंधित विभागाशी पत्रव्यवहार केला तसेच संबंधित विक्रेत्यांना दुकाने इतरत्र हलवण्याच्या सूचना दिल्या मात्र विक्रेत्यांनी या सूचनांना केराची टोपली दाखवत याच परिसरात ठाण मांडून बसणे पसंत केले आहे.

खापरखेडा परिसरात अनेक नामांकित शाळा आणि महाविद्यालये आहेत दररोज शेकडो लहान-मोठे विद्यार्थी मुख्य मार्गावरून येत जात असतात. रस्त्याच्या कडेलाच उघड्यावर बकरे आणि कोंबड्यांची कत्तल केली जाते हा थरार रोज लहान मुलांच्या डोळ्यादेखत घडतो. या भीषण दृश्यांमुळे शाळकरी मुलांच्या मनावर विपरीत परिणाम होत असून पालकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.

चिचोली आठवडी बाजारात मटण व चिकन विक्रेत्यांची सोय व्हावी यासाठी आमदार निधीतून तब्बल १२ लाख रुपये खर्च करून टिनाच्या




शेडचे ओटे बांधण्यात आले आहेत. मात्र, चिकन व मटण विक्रेते याठिकाणी जाण्यास तयार नाहीत. स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन केवळ नोटिसा बजावण्याची औपचारिकता पूर्ण करते परंतु प्रत्यक्षात मतांच्या राजकारणापोटी कोणतीही ठोस कारवाई करण्यास धजावत नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

या गंभीर समस्येबाबत खापरखेडा पोलिसांना कळविण्यात वाले मात्र चिकन व मटण मार्केट चिचोली व चनकापूर ग्रामपंचायत हद्दीत येत असल्याचे कारण पुढे करून पोलिसांनी हात झटकले आहेत त्यामुळे दाद मागावी तरी कोणाकडे? असा प्रश्न स्थानिक जनतेला पडला आहे.

राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर, आता या परिसरातील नागरिकांनी थेट आयुक्तांकडेच लेखी पत्रव्यवहार करून तक्रार नोंदवली आहे. अन्न व औषध प्रशासन विभाग या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन खापरखेडा परिसरातील या बेकायदेशीर मार्केटवर कधी कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने तात्काळ पावले न उचलल्यास स्थानिक नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### पुणे - बेंगलोर हायवेवर वडगावजवळील अबप फाटा येथे कंटेनर पलटी

**अक्षराज : राहुल शिंदे**

**दि.१८, पेठवडगांव (कोल्हापूर) :** पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर वाठार तर्फे वडगाव हद्दीतील अबप फाटा येथे शनिवार, दिनांक १८ जुलै रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला. पाटील पेट्रोल पंपासमोर MH43 BG9793 क्रमांकाचा Ashok Leyland कंपनीचा कंटेनर ट्रक पावसामुळे निसरडा झालेल्या रस्त्यावरून घसरून पलटी झाला.

या अपघातात ट्रक चालक जखमी झाला असून, त्याला तात्काळ स्थानिक नागरिक मदतीने १०८ नबरवर फोन करून उपचार केले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सततच्या पावसामुळे महामार्गाचा सर्व्हिस रोड निसरडा झाला होता. तसेच रस्त्याच्या कडेला मोठे खड्डे व चिखल साचला होता. त्यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून कंटेनर रस्त्याच्या कडेला उलटला. अपघातानंतर वडगाव पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक सुरळीत केली. क्रेनच्या साहाय्याने कंटेनर बाजूला करण्याचे काम सुरू आहे. यामुळे पुणे-बेंगलोर हायवेवर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.वाठार तर्फे वडगाव ते अबप फाटा दरम्यानच्या सर्व्हिस रोडची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली आहे. पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) व झथृ ने तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व वाहनचालकांनी केली आहे.

### अनाधिकृत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे शासकीय शाळेत समायोजन करण्याची प्रहार मागणी




**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.१८, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल शहरात साधारण २२ अनधिकृत शाळा असल्याचे रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाने जाहीर केले आहे. यात अनेक विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने पालक व विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. सदर या अनाधिकृत शाळांची कृती ही बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणचा हक्क अधिनियम आणि शालेय शिक्षण विभाग व महिला व बाल विकास यांनी विद्यार्थी / बाळकांच्या सुरक्षा विषयक वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचे उल्लंघन करणारे आहे. तसेच या अनधिकृत शाळामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची दखल घेत त्यांना तत्काळ नजीकच्या शासकीय आणि पालिकेच्या शाळांमध्ये समायोजन करण्याची मागणी डॉ. सुनील शिरीषकर, जिल्हा उपाध्यक्ष रायगड प्रहार जनशक्ती पक्ष यांनी गट शिक्षणाधिकारी पनवेल, आयुक्त पनवेल व महापौर पनवेल यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली असल्याची माहिती निवेदनद्वारे दिली आहे. तसेच या ठिकाणी अनधिकृत शाळांनी शासनाची/ स्थानिक प्राधिकरणाची कोणतीही परवानगी न घेता बिनदिक्कतपणे अनधिकृत शाळा कोणाच्या आशीर्वादाने सुरू ठेवले आहे. तसेच या शाळांना मान्यता नसताना त्यांना पनवेल महानगर पालिकेतून आणि पंचायत समिती शिक्षण विभाग पनवेल मधील कोणाच्या आशीर्वादाने पायाभूत सुविधा दिल्या गेल्या याची सखोल चौकशी करण्यात यावी. सदर या शाळांमध्ये नियमांचे पालन होत नसल्याने बालकांच्या काळजी व संरक्षणाबाबत प्रश्न निर्माण होवून अनुचित प्रकार जबाबदार कोण ही परिस्थिती निर्माण होऊ शकते. म्हणून या अनधिकृत शाळाचे पाणी पुरवठा व लाईट कनेक्शन बंद करून संबंधित शाळेवर तातडीने कारवाई करण्यासह या शाळांवर नियमाप्रमाणे दंडात्मक व द्रव्य शुल्क भरण्याचे आदेश देणे, संबधित शाळा व त्यांचे संस्थाचालक यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी इतर प्रमुख मागण्या प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

पनवेल परिसरातील होतकरू, गरजू पालक व पाल्यांची जाणीवपूर्वक या शाळा व संस्थाचालक फसवणूक करीत असल्याने त्यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करून नियमाप्रमाणे कारवाई न केल्यास प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### पैशाच्या व्यवहारातून इंदोली ब्रीजजवळ थरार



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, कराड (सातारा) :** कराड तालुक्यातील पेरले गावच्या हद्दीत इंदोली ब्रीजजवळील पाणंद रस्त्यावर पैशाच्या व्यवहाराच्या वादातून एका व्यक्तीवर पिस्तुलातून दोन राऊंड गोळीबार झाल्याची गंभीर घटना शुक्रवारी (दि. १७) मध्यरात्री घडली. या गोळीबारात संतोष शंकर घोलप (वय ३७, सध्या रा. उंब्रज) हे दोन्ही पायांना गोळ्या लागून गंभीर जखमी झाले आहेत.

याप्रकरणी उंब्रज पोलिस ठाण्यात सोमनाथ रमेश चव्हाण (रा. कालगाव) व योगेश सुदाम दीक्षित (रा. मसूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०९(१), ४९, ३५१(३), ३५२, ३(५), शस्त्र अधिनियम कलम ३(१), २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम २०१४ चे कलम ३७(१)(३)/१३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संतोष घोलप यांना आरोपी सोमनाथ चव्हाण याने पैशाचा व्यवहार मिटविण्याच्या बहाण्याने पेरले गावच्या हद्दीत इंदोली ब्रीजजवळ बोलावले होते. त्यावेळी आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून धमकावले. त्यानंतर सोमनाथ चव्हाण याने त्याच्या फॉर्च्युनर (क्र. चक-५०-०२२२) या वाहनातून पिस्तुल काढून जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने दोन राऊंड गोळीबार केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. गोळ्या चुकविण्याचा प्रयत्न करत असताना त्यांच्या उजव्या व डाव्या पायाला गोळ्या लागून ते गंभीर जखमी झाले.

जखमी संतोष घोलप यांच्यावर कराड येथील सिटी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असून, तेथेच वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांचा जबाब नोंदवून ई-साक्ष कार्यप्रणालीद्वारे फिर्याद नोंदविण्यात आली.

घटनेच्या वेळी सातारा जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार शस्त्रबंदी लागू असल्याने आरोपींविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक पंकज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणूक; ठरावांची प्रक्रिया संपली

## शिंदे, लंके, थोरातांसह मातब्बरांची ताकद पणाला



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, अहिल्यानगर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीसाठी मतदार प्रतिनिधींचे ठराव सादर करण्याची अंतिम मुदत गुरुवारी संपली. ठराव प्रक्रियेदरम्यान जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत स्थानिक राजकीय समीकरणे पुन्हा चर्चेत आली. ठराव प्रक्रियेदरम्यान काही ठिकाणी राजकीय चुरस पाहायला मिळाली.

विशेषतः पारनेर तालुक्यात ठरावावरून संचालकांच्या कथित अपहरणाच्या आरोपांमुळे हा विषय चर्चेत राहिला. काही नव्या इच्छुकांनाही सहकार क्षेत्रात स्थान मिळवण्यासाठी राजकीय संघर्षाचा सामना करावा लागल्याचे चित्र दिसले. यंदाच्या प्रक्रियेत विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या नावाने कर्जत आणि जामखेड तालुक्यांतील विकास सोसायट्यांनी ठराव केले आहेत. प्रा. शिंदे प्रथमच जिल्हा सहकारी बँकेच्या राजकारणात सक्रिय होणार असल्याची चर्चा आहे. तर अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार नीलेश लंके यांच्या नावाने पारनेर तालुक्यातून ठराव करण्यात आला आहे. संगमनेर तालुक्यात माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नावाने जोर्वे विकास सोसायटी तसेच सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने ठराव केला आहे. यावरून संगमनेरमधील सहकार आणि स्थानिक राजकारणातील त्यांचा प्रभाव कायम असल्याचे दिसून येते.

यंदाच्या ठराव प्रक्रियेत अनेक विद्यमान आणि माजी आमदारांच्या नावाने ठराव झाल्याने स्थानिक पातळीवरील त्यांचे राजकीय अस्तित्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. त्यामुळे संचालक पदासाठी होणाऱ्या निवडणुकीत अनेक तालुक्यात चुरशीच्या लढती अपेक्षित आहेत. राहाता तालुक्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समर्थकांच्या नावाने ठराव झाले असून अंतिम उमेदवारीबाबत उत्सुकता आहे. राहुरीत भाजपचे आमदार प्राजक्त तनपुरे, हर्ष तनपुरे आणि उषा तनपुरे यांच्या नावाने ठराव करण्यात आले आहेत.

#### काळे - कोल्हे यांच्या नावाने ठराव

कोपरगावात अजित पवार राष्ट्रवादीचे आमदार अशुतोष काळे यांच्या नावाने ठराव करण्यात आला आहे. भाजपचे विधान परिषदेचे आमदार विवेक कोल्हे यांच्या नावानेही ठराव झाला असून दोन्ही नेते यापूर्वी जिल्हा बँकेच्या संचालक मंडळावर प्रतिनिधित्व करत होते. अकोले तालुक्यात अजित पवार राष्ट्रवादीचे आमदार डॉ. किरण लहामटे,माजी अध्यक्ष सीताराम गायकर, माजी आमदार वैभव पिचड आणि मधुकर नवले यांच्या नावाने ठराव झाले आहेत.

#### गडाख - मुरकुटे अन् विखे समर्थक

नेवासामध्ये माजी मंत्री शंकरराव गडाख, माजी सभापती सुनीता गडाख यांच्या नावाने ठराव झाले असून, शिवसेनेचे आमदार विठ्ठल लंघे यांच्या समर्थकांच्या नावानेही ठराव करण्यात आले आहेत. श्रीरामपूरमध्ये माजी आमदार भानुदास मुरकुटे, नगराध्यक्ष करण ससाणे तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समर्थकांच्या नावानेही ठराव झाले आहेत.

#### कर्डीले, कोतकर, जगताप, पानसरे

नगर जिल्ह्यात भाजपचे आमदार अक्षय कर्डीले, प्रताप शेळके, माधव लामखडे आणि काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष भानुदास कोतकर यांच्या नावाने ठराव करण्यात आले आहेत. शेवगावात माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले, जयश्री घुले तसेच भाजप समर्थकांच्या नावानेही ठराव झाले आहेत. श्रीगोंद्यात माजी आमदार राहुल जगताप, प्रतापसिंह पाचपुते, दत्ता पानसरे आणि बाळासाहेब नाहाटा यांच्या नावाने ठराव करण्यात आले आहेत.

#### शिंदे, राजळे, ढाकणे

कर्जतमध्ये प्रा.राम शिंदे यांच्यासह मंजुषा गुंड, सुनंदा पिसाळ, काकासाहेब तापकिर आणि सुरेश साळुंके यांच्या नावाने ठराव झाले आहेत.

पाथर्डीत भाजप आमदार मोनिका राजळे, प्रताप ढाकणे, ऋषिकेश ढाकणे, अर्जुन शिरसाट, काशिनाथ लवांडे आणि संभाजी वाघ यांच्या नावाने ठराव करण्यात आले आहेत. जामखेडमध्ये प्रा. राम शिंदे आणि माजी संचालक अमोल राळेभात यांच्या नावाने ठराव झाले आहेत.

#### लंके, दाते, झावरे, तनपुरे, विखे समर्थक

पारनेरमध्ये खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, गीतांजली शेळके, माजी आमदार नंदकुमार झावरे,सबाजी गायकवाड आणि सुजित झावरे पाटील यांच्या नावाने ठराव झाले असून, सर्वाधिक ठराव पारनेर तालुक्यात झाल्याची माहिती आहे.

## वारकऱ्यांच्या स्वागतासाठी शासन व प्रशासन सज्ज - पालकमंत्री गोरे

### पालखीतळावर जर्मन हँगर, हायमास्ट; वाखरीत मुरमीकरणाचे निर्देश, निधीची तरतूद करणार

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१८, पंढरपूर :** आषाढी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी मानाच्या पालखी सोहळ्यासह सर्व पालख्या, दिंड्या व लाखो वारकरी सोलापूर जिल्ह्यात येत असून त्यांच्या स्वागतासाठी शासन व प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गातील सर्व पालखीतळ व रिंगण सोहळ्याच्या ठिकाणांची पाहणी केल्यानंतर पालकमंत्री बोलत होते. ते म्हणाले, सर्व पालखीतळ, विसावा ठिकाण, मुक्कामाचे ठिकाण व रिंगणाच्या ठिकाणी वारकऱ्यांसाठी खूप चांगल्या सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. वारकऱ्यांच्या स्वागतासाठी संपूर्ण जिल्ह्यात उत्साही व आनंदी वातावरण आहे आणि याच वातावरणात पालख्यांचे स्वागत केले जाणार आहे.वारकऱ्यांनीही आनंदी वातावरणात श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घ्यावे. वारकऱ्यांच्या सुविधेसाठी प्रशासन चांगले काम करत आहे, त्यामुळे वारकरी समाधानी राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

#### पावसाच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना

जिल्ह्यात मागील दोन-तीन दिवसांपासून पाऊस सुरू आहे. यासंदर्भात पालकमंत्री म्हणाले, पालखीतळावर पावसामुळे वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी जर्मन हँगर, वॉटरप्रूफ मंडप यासह अन्य सर्व प्रकारच्या सुविधा करण्यात आल्या आहेत. भंडी शेगाव सह ज्या पालखीतळावर पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नाही, अशा ठिकाणी जिल्हा परिषदेने तात्काळ आणखी हायमास्ट बसवून घ्यावेत. यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध केला जाईल.



#### वाखरी पालखीतळासाठी तातडीचे निर्देश

सार्वजनिक बांधकाम विभागाला निर्देश देताना पालकमंत्री गोरे म्हणाले, वाखरी पालखीतळावर चिखल होणार नाही व पाणी साचणार नाही यासाठी त्वरित मुरमीकरण करून घ्यावे. कामासाठी केवळ दोनच दिवस शिल्लक असल्याने तातडीने कार्यवाही करावी. आवश्यक निधी जिल्हा नियोजन समितीमधून उपलब्ध करण्यात येईल.

#### श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी आगमनाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांची मुक्काम-विसावा ठिकाणांची पाहणी

आषाढी वारी २०२६ च्या अनुषंगाने दि. १९ जुलै २०२६ रोजी श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथे आगमन होत आहे. पालखी समवेत लाखो वारकरी भाविक पायी येतात. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज धर्मपुरी, पुरंदावडे, नातेपुते, माळशिरस, सदाशिवनगर, वेळापूर व भंडी शेगाव, वाखरी येथील पालखी मुक्काम, विसावा व रिंगणाच्या ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी शासन व प्रशासनाच्या वतीने वारकरी-भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या जर्मन हँगर, वॉटरप्रूफ मंडप, फिरती शौचालये व पिण्याच्या पाण्याच्या टँकर व्यवस्थेची पालकमंत्र्यांनी माहिती घेतली. तसेच आरोग्य विभागाच्या वतीने सर्व ठिकाणी वारकऱ्यांसाठी देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधा तसेच औषधे याचीही माहिती घेतली. त्यांनी प्रत्येक ठिकाणाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना दिल्या.

मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्रातील विविध सुविधांची माहिती त्यांनी घेतली.पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना पालखी मार्गावर तसेच विसावा, मुक्काम व रिंगणाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही, या दृष्टीने नियुक्त केलेल्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी परस्परांत समन्वय ठेवून काम करावे, अशा सूचना पालकमंत्री गोरे यांनी दिल्या. स्वच्छता, आरोग्य सुविधा, वाहतूक नियोजन व सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.या पाहणी दौऱ्यावेळी आमदार उत्तम जानकर, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, माळशिरसच्या उपविभागीय अधिकारी विजया पांगरकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, तहसीलदार सुरेश शेजुळ, पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार, कार्यकारी अभियंता अमित निमकर, सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह संबंधित ठिकाणचे स्थानिक अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

## संत ज्ञानेश्वर महाराज मूकबधिर विद्यालय कळंब येथे दिव्यांग व्यक्तींसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१८, कळंब (धाराशिव) :** डॉ.रेड्डीज फाउंडेशन पुणे आणि तुळजाई प्रतिष्ठान संचलित संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मुकबधिर विद्यालय कळंब ता. कळंब जि.धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने सुशिक्षित बेरोजगार दिव्यांग मुकबधिर / कर्णबधिर व्यक्तींसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन दिनांक २१/०७/ २०२६ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता करण्यात आलेले आहे.

उद्घाटक सुनंदा शिवाजी कापसे नगराध्यक्ष नगरपरिषद कळंब ता.कळंब जि.धाराशिव कार्यक्रमाचे अध्यक्ष शहाजी चव्हाण सचिव-तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगांव ता.कळंब जि.धाराशिव प्रमुख पाहुणे देवदत्त गिरी सहाय्यक आयुक्त जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी जि. प. धाराशिव, सच्चिदानंद बांगर वै.सा.का.जिल्हा दिव्यांग विभाग जि.प.धाराशिव, कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक गौतम काळे डॉ.रेड्डीज फाउंडेशन पुणे व राम म्हात्रे एरिया हेड, कोरेगाव पार्क सेंटर डॉ. रेड्डीज फाउंडेशन पुणे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

ठिकाण संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मुकबधिर विद्यालय येरमाळा रोड, मानधने पेट्रोल पंपा समोर कळंब ता. कळंब जि. धाराशिव येथे आयोजित केले जाणार आहे.

तरी धाराशिव जिल्ह्यातील १८ ते ३५ वयोगटातील, इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण असलेल्या दिव्यांग मुकबधिर / कर्णबधिर सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शहाजी चव्हाण सचिव - तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगांव ता.कळंब यांनी केले आहे.

# एफआयआर च्या कामाचा बीएलओंवर प्रचंड ताण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एसआयआर) म हिमेमुळे पारनेर तालुक्यातील बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांच्यावर कामाचा प्रचंड ताण निर्माण झाला आहे. अपुऱ्या मनुष्यबळात आणि आवश्यक सुविधांच्या अभावात काम करताना त्यांची मोठी दमछाक होत आहे. दैनंदिन शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळत एसआयआरचे काम वेळेत पूर्ण करण्याचे मोठे आव्हान शिक्षकांसमोर उभे राहिले आहे.

एसआयआर अंतर्गत प्रत्येक म तदाराची माहिती पडताळणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, घरभेटी देणे, स्थलांतरित व अनुपस्थितीत मतदारांचा शोध घेणे, ऑनलाईन माहिती अद्ययावत करणे आणि रोजचा अहवाल सादर करणे अशा अनेक जबाबदाऱ्या बीएलओंवर टाकण्यात आल्या आहेत. मात्र, या कामासाठी पुरेसे मनुष्यबळ, प्रवासभत्ता, तांत्रिक सुविधा किंवा पुरेसा कालावधी उपलब्ध नसल्याची खंत शिक्षकांमधून व्यक्त होत आहे.

ग्रामीण भागात अनेक नागरिक कामानिमित्त बाहेरगावी असल्याने वारंवार घरभेटी द्याव्या लागत आहेत. काही ठिकाणी नागरिकांकडे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याने पडताळणी रखडत आहे. इंटरनेटची समस्या, म ोबाईल ॲपमधील तांत्रिक अडचणी आणि सतत बदलणाऱ्या सूचनांमुळे बीएलओंचा वेळ व श्रम अधिक खर्ची पडत आहेत. विशेष म्हणजे बहुतांश बीएलओ हे शिक्षक असल्याने शाळेतील अध्यापन आणि एसआयआरचे काम यांचा समतोल राखणे कठीण होत आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामावरही परिणाम होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

> एलओंनी प्रशासनाकडे अतिरिक्त मनुष्यबळ,पुरेसा वेळ, तांत्रिक सहाय्य, वाहतूक सुविधा आणि स्पष्ट नियोजनाची मागणी केली आहे. अन्यथा एसआरआरची गुणवत्ता आणि वेळेत पूर्तता यावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता असल्याचे मत तालुक्यातील शिक्षकांमधून व्यक्त केले जात आहे.
>
> ---
>
> बीएलओ यांच्यावर कामाचा प्रचंड ताण असून शाळा सोडून बीएलओचेच काम करावे लागत आहे. यामुळे अध्यापन प्रक्रिया थांबली असून विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षकांना या कामातून वगळणे गरजेचे आहे.
>
> **- दत्तात्रय चौरे (बीएलओ, टाकळी ढोकेश्वर)**

# विंचूर परिसरात अघोषित लोडशेडिंग; नागरिक व शेतकरी हैराण

## ग्रामपंचायतीचे महावितरणला साकडे; नियमित वीजपुरवठा न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील मौजे विंचूर आणि ग्रामीण भागात सध्या सुरू असलेल्या तीव्र व अघोषित लोडशेडिंगमुळे नागरिक आणि शेतकरी पुरते हैराण झाले आहेत. ऐन पावसाळ्याच्या आणि शेतीच्या हंगामात वीज पुरवठा खंडित होत असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर, विंचूर ग्रामपंचायतीच्या वतीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) कनिष्ठ अभियंत्यांना एक लेखी निवेदन देण्यात आले असून, लोडशेडिंग तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान; पालक चिंतेत**

सध्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सुरू आहे. म ात्र, अचानक आणि दीर्घकाळ होणाऱ्या लोडशेडिंगमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात मोठे अडथळे निर्माण होत आहेत. रात्रीच्या वेळी तासनतास वीज गुल राहत असल्याने मुला-मुलींना मेणबत्ती किंवा कंदिलाच्या अंधारात अभ्यास करावा लागत आहे. याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

**घरगुती कामांची कसरत, शेती पिके धोक्यात**

केवळ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानच नाही, तर वीज खंडित होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांनाही आपल्या दैनंदिन घरगुती कामांसाठी मोठी कसरत करावी लागत आहे. दुसरीकडे, शेतीचा हंगाम रंगात आला असून शेतकऱ्यांची अनेक कामे विजेवर अवलंबून आहेत. ऐन कामाच्या वेळेतच वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने पिकांना पाणी देणे आणि इतर शेतीची कामे करणे अशक्य झाले आहे. यामुळे हातात आलेली पिके जळून जाण्याची व नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

**अखंडित वीजपुरवठा**



> **प्रशासक काय म्हणाले?**
>
> ग्रामीण भागातील जनता आधीच विविध समस्यांशी झगडत आहे, त्यात आता या अघोषित लोडशेडिंगची भर पडली आहे. नागरिकांचे हाल आणि शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान पाहता महावितरणने या समस्येकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास नागरिकांचा असंतोष अधिक तीव्र होईल.
>
> **- प्रशासक, सचिन दरेकर. ग्रामपंचायत विंचूर**

**करण्याची मागणी**

विंचूर ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्यांना विनंती करण्यात आली आहे की, या गंभीर समस्येवर सहानुभूतीपूर्वक विचार करून ग्रामीण भागातील लोडशेडिंगचे प्रमाण तात्काळ कमी करावे. शक्य असल्यास हे लोडशेडिंग पूर्णपणे बंद करून परिसराला नियमित आणि अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा. आता या निवेदनानंतर वीज महामंडळ काय पावले उचलते आणि विंचूर वासीयांना या अंधारातून कधी दिलासा मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालयात पालकांची अकरावी विज्ञान अतिरिक्त तुकडीची मागणी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालय खापरखेडा हे विज्ञान शाखेचे एकमेव अनुदानित महाविद्यालय असल्याने खापरखेडा व परिसरातील जवळपास २७ गावांमधून इयत्ता अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश व्हायचे मागील शैक्षणिक सत्रापासून शासनाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश होत असल्याने इयत्ता अकरावी विज्ञान शाखेच्या मंजूर तुकडीनिहाय तीन तुकडीमध्ये केवळ कॅपद्वारे १८० प्रवेशच महाविद्यालयीन प्रशासनाला घेता येतात यावर एकही अतिरिक्त प्रवेश घेता येत नाही.

यापूर्वी ऑफलाइन प्रवेश प्रक्रिया असताना प्रवेश क्षमता पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त २०% जागा मा. शिक्षण उपसंचालक नागपूर यांच्याकडून वाढवून देण्यात येत असे त्यामुळे महाविद्यालयात जवळपास २५० ते २६० विद्यार्थ्यांचे प्रवेश व्हायचे व परिसरातील एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत नसे.

**मर्यादित प्रवेश क्षमतेमुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता**

मागील शैक्षणिक सत्रापासून केवळ मंजूर प्रवेश क्षमता १८० एवढेच प्रवेश केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे होत असल्याकारणाने खापरखेडा व परिसरातील जवळपास २७ गावातील ६० ते ७० विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशाकरिता दूरवर नागपूर सारख्या शहराकडे जावे लागत असल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक बोजा पालकांना सहन करावा लागत आहे तसेच विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त वेळ येण्या जाण्यामध्ये प्रवासात जात असल्याकारणाने त्यांचा अभ्यासाचा अमूल्य वेळ निरर्थक जात आहे तर अनेक पालकांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याकारणाने त्यांचे पाल्य शिक्षणापासून वंचित राहण्याची स्थिती निर्माण झाली आहे. या संदर्भात परिसरातील सगळ्या पालकांनी महाराष्ट्र विद्यालयातील प्राचार्यांना भेट देऊन विचारणा केली असता प्राचार्य अरुण वडस्कर यांनी सांगितले की विज्ञानच्या अतिरिक्त तुकडीचा प्रस्ताव हा शालेय शिक्षण विभाग मंत्रालय येथे मंजुरीसाठी मागील तीन वर्षापासून प्रलंबित असल्याने शासनाच्या धोरणानुसार मंजूर प्रवेश क्षम ता १८० च्या वर एकही अतिरिक्त प्रवेश आम्हाला घेता येत नाही त्या कारणाने मागील शैक्षणिक सत्रात जवळपास ६० ते ७० विद्यार्थ्यांची मागणी असताना सुद्धा महाविद्यालयात प्रवेश देता आले नाही व त्या विद्यार्थ्यांना नाइलाजास्तव बाहेर शहरात नागपूरकडे जावे लागले. शासनाने मागील वर्षी ज्यांची प्रवेश क्षमता पूर्ण झाली आहे व ज्या महाविद्यालयात सर्व भौतिक सोयी सुविधा उपलब्ध आहे. अशा महाविद्यालयास अतिरिक्त तुकडी देण्यात येईल असे आश्वासित केले होते. परंतु अद्याप पर्यंत महाविद्यालयास अतिरिक्त तुकडी मंजूर करण्यात आली नाही. जर शासनाने अतिरिक्त तुकडीस मंजुरी प्रदान केली तर खापरखेडा व परिसरातील सर्व पालकांची विद्यार्थ्यांची इयत्ता अकरावी विज्ञान शाखेची प्रवेशाची चिंता दूर होईल व कोणीही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही व तसेच प्रवेशाकरिता बाहेर नागपूरला जावे लागणार नाही.

**पालकांमध्ये तीव्र नाराजी**

खापरखेडा परिसरातील महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालय हे एकमेव अनुदानित विज्ञान शाखेचे महाविद्यालय असल्याने परिसरातील सर्व पालक आपल्या पाल्यांचे इयत्ता अकरावी प्रवेश येथे घेतात परंतु शासनाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या धोरणामुळे व मर्यादित प्रवेश क्षमतेमुळे अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश स्थानिक म हाराष्ट्र विद्यालयात होत नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना नागपूर सारख्या शहराकडे जावे लागत असल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याने अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची स्थिती निर्माण झाली असून याविषयी पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली व शासनाने याकडे लक्ष देऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जाणून स्थानिक खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयात इयत्ता अकरावी विज्ञान शाखेची अतिरिक्त तुकडीस मान्यता प्रदान करण्याची विनंती केली आहे.

# शिळ गावात धूर व औषध फवारणीला सुरुवात; दोन्ही नगरसेविकांनी घेतली तातडीची दखल

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१८, शिळगाव (ठाणे) :** गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे शिळ गावात ठिकठिकाणी पाणी साचून मच्छरांची मोठ्या प्रमाणात पैदास झाली होती. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया सारख्या आजारांचा धोका वाढल्याने ग्रामस्थांनी सोशल मीडियावर पोस्ट टाकून आपल्या व्यथा मांडल्या होत्या. ग्रामस्थांच्या या सोशल मीडियावरील तक्रारींची दिवा प्रभाग समितीतील प्रभाग क्रमांक २९-ब च्या नगरसेविका वेदिका साहिल पाटील आणि प्रभाग क्रमांक



२९-अ च्या नगरसेविका सौ. अर्चना निलेश पाटील यांनी तातडीने दखल घेतली. दोन्ही नगरसेविकांनी संयुक्तपणे ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून संपूर्ण शिळ गावात तातडीने धूर फवारणी आणि औषध फवारणी करण्याची मागणी केली.

त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, आजपासून शिळ गावात धूर फवारणी व औषध फवारणीच्या काम ाला सुरुवात करण्यात आली आहे. टप्प्याटप्प्याने गावातील सर्व भागांमध्ये ही फवारणी केली जाणार असून त्यामुळे मच्छरांचा बंदोबस्त होऊन नागरिकांना म ोठा दिलासा मिळणार आहे. नागरिकांनी सोशल मीडियाद्वारे मांडलेल्या सम स्येची आम्ही तातडीने दखल घेतली. नागरिकांचे आरोग्य जपणे हे आमचे प्रथम कर्तव्य आहे. पुढेही अशाच प्रकारे आपल्या सर्वांच्या प्रश्नांसाठी आम्ही तत्पर राहू, असे दोन्ही नगरसेविकांनी सांगितले. दोन्ही नगरसेविकांच्या या संवेदनशील आणि त्वरित कार्यवाहीबद्दल शिळ गावातील नागरिकांनी सोशल मीडियावरच त्यांचे आभार मानले आहे.

## थोडक्यात बातम्या

# 'शिवाई' इलेक्ट्रिक बस मुक्रमाबादमध्ये दाखल; ग्रामस्थांकडून जंगी स्वागत...



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१८, मुखेड (नांदेड) :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या देगलूर आगारातुन नव्याने सुरू झालेली 'शिवाई' (इलेक्ट्रिक) ई-बस आज गुरुवार दिनांक १६ रोजी देगलूर ते लातूर या मार्गावर पहिल्यांदाच धावली. या अत्याधुनिक, पर्यावरणपूरक आणि वातानुकूलित बसचे मुक्रमाबाद येथे पहिल्यांदाच आगमन झाले. मुक्रमाबाद मुख्य बस स्थानकावर बस पोहोचताच स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात तिचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांनी महिला वाहक व चालक यांना पुष्पगुच्छ देऊन आणि पेढे भरवून त्यांचा विशेष सत्कार केला, तसेच बसची विधिवत पूजा करून नारळ फोडण्यात आला.

**प्रवाशांना मिळणार प्रदूषणमुक्त आणि आरामदायी सेवा**

देगलूर - मुक्रमाबाद - उदगीर - लातूर या महत्त्वाच्या मार्गावर ही आधुनिक 'शिवाई' बस सेवा सुरू झाल्यामुळे या भागातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. ही बस पूर्णपणे इलेक्ट्रिक असल्याने तिचा प्रवास पूर्णपणे ध्वनी आणि वायू प्रदूषणमुक्त असेल. तसेच वातानुकूलित (AC) सुविधेमुळे प्रवाशांचा प्रवास अत्यंत सुकर आणि सुखाचा होणार आहे. डिझेलची बचत आणि पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने एसटी प्रशासनाने उचललेले हे पाऊल अतिशय कौतुकास्पद असल्याचे मानले जात आहे.

रेंगाळत पडलेल्या बहुचर्चित रेणापूर निझामाबाद राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रगती पथावर असतांना व देगलूर आगाराला नविन सात ई - बसेस मंजूर झाल्यामुळे ही बससेवा सुरु करून मुक्रमाबाद आणि परिसरातील ग्रामीण भागातील प्रवाशांना लातूर या मोठ्या शहराला जोडल्यामुळे समाधान व्यक्त होत आहे. पहिल्याच फेरीत बसला पाहण्यासाठी व चालक-वाहकांचे अभिनंदन करण्यासाठी शहरातील मुख्य बस स्थानक परिसरामध्ये प्रवाशांची व शालेय विद्यार्थी, नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. या नव्या आरामदायी वातानुकुलीत सेवेमुळे देगलूर, मुक्रमाबाद, उदगीर, लातूर या प्रमुख शहरांशी असणारा संपर्क अधिक जलद, सुरक्षित आणि सोयीचा झाला आहे.

या ऐतिहासिक स्वागत प्रसंगी मुक्रमाबाद गावातील प्रमुख लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, व्यापारी, तरुण मंडळी आणि मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित होते. या नव्या बस सेवेबद्दल परिसरातील विद्यार्थी, नोकरदार वर्ग आणि सामान्य प्रवाशांनी आनंद व्यक्त केला असला तरी पुर्वी चालू असलेल्या लांब पल्ल्याच्या मुंबई, पुणे अश्या बसेस पुर्ववत सुरु कराव्यात अशा ही मागणीची चर्चा प्रवाशात होत असून एसटी महामंडळाचे जाहीर आभार मानले आहे.

# कोक येथील निजामकालीन जि.प. शाळेची इमारत मृत्यूचा सापळा



**अक्षराज : रहीम कोकर**

**दि.१८, जिंतूर :** तालुक्यातील कोक येथील जिल्हा परिषद शाळेची निजाम कालीन इमारत आज अत्यंत जीर्ण अवस्थेत असून ती कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या स्थितीत आहे. इमारतीचा मोठा भाग आधीच पडला असून उर्वरित भागही धोकादायक बनला आहे. या धोकादायक इमारतीला लागूनच अंगणवाडी तसेच मराठी आणि उर्दू शाळा सुरू असल्याने विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांच्या जीवितालाा गंभीर धोका निर्माण झाला आहे.प्रत्यक्ष पाहणीमध्ये इमारतीच्या भिंतींना मोठम ोठे तडे गेलेले दिसून येतात. छताचा काही भाग कोसळला असून आतील संरचना पूर्णपणे कमकुवत झाली आहे.

परिसरात लहान मुले सतत वावरत असल्याने कोणत्याही क्षणी मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.स्थानिक ग्रामस्थ, पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेक वेळा संबंधित विभाग, जिल्हा परिषद आणि शासनाकडे ही धोकादायक इमारत पाडून नवीन इमारत उभारण्याची मागणी केली आहे. मात्र, अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने इमारतीची अवस्था आणखी खालावली आहे. जोरदार पाऊस किंवा वाऱ्यामुळे इमारतीचा उर्वरित भाग कोसळल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने एखादी दुर्घटना घडण्याची वाट न पाहता तातडीने या इमारतीचे संरचनात्मक परीक्षण करून धोकादायक भाग पाडावा व नवीन शाळा इमारतीसाठी निधी मंजूर करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

अनर्थ होण्यापूर्वी शासन जागे होणार का? असा संतप्त सवाल आता कोक ग्राम स्थांकडून उपस्थित केला जात आहे.

# सहा.पोलीस आयुक्त सुदर्शन होनवडकर यांचा सत्कार



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१८, कुंडलवाडी :** कर्तव्यदक्षता, प्रामाणिकपणा आणि जनसेवेचा वसा जपणारे लोकप्रिय पोलीस अधिकारी सुदर्शन होनवडकर यांची सहाय्यक पोलीस आयुक्त, मुंबई शहर या अत्यंत मानाच्या पदावर पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या दैदिप्यमान यशाचा आणि अविरत सेवेचा गौरव करण्यासाठी के.रामलू शाळेच्या वतीने नुकताच त्यांचा जाहीर सन्मान व सत्कार करण्यात आला होता.

**'दै.अक्षराज'मधील विशेष लेखाची 'पीडीएफ फोटो फ्रेम' भेट**

काही दिवसांपूर्वीच सुदर्शन दादा यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वावर, पत्रकार दत्ता हमंद यांच्या आईच्या दुःखद घटना प्रसंगी केलेली मदत आणि त्यांनी पोलीस दलात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीवर प्रकाश टाकणारा एक विशेष लेख 'दै.अक्षराज' या नामांकित वर्तम ानपत्रात प्रसिद्ध झाला होता. दादांच्या कार्याचा हाच अमूल्य दस्तऐवज एका सुंदर व आकर्षक 'पीडीएफ फोटो फ्रेम' च्या स्वरूपात त्यांना सत्कारप्रसंगी भेट देण्यात आला.

पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष तथा के. रामलू शाळेचे सहशिक्षक दत्ता हमंद यांच्या वतीने हा मानाचा लेख आणि प्रेमळ सत्कार भेट सुदर्शन दादांना अत्यंत आदराने सुपूर्द करण्यात आली.

कर्तव्याचा मार्ग ज्यांचा प्रामाणिकतेने सजला, जनतेच्या सेवेसाठी त्यांचा प्रत्येक क्षण वाहिला अशा जनसामान्यांच्या 'खाकी'तील हिरोचा आज यथोचित गौरव झाला! अशा शब्दांत यावेळी दादांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.